# भारतीय जनता पार्टी - उत्तर मुंबई

कांती टेरेस, विवेकानंद रस्ता, कांदिवली पश्चिम, मुंबई - ४०० ०६७ दूरध्वनी : २८६६ ३५२४ फॅक्स : २८०७ ३२०१


**कृपया प्रसिध्दीसाठी** **5 ऑक्टोबर 2008**

## उत्तर मुंबईत राष्ट्रवादी काँग्रेस व रिपब्लीकनच्या प्रमुख कार्यकर्त्यांचा भाजपामध्ये प्रवेश

मुंबई, रविवार : राष्ट्रवादी काँग्रेसच्या 20 प्रमुख कार्यकर्त्यांनी तर रिपब्लीकन पार्टीच्या 15 महत्वाच्या कार्यकर्त्यांनी काल माजी पेट्रोलियम मंत्री श्री. राम नाईक यांच्या उपस्थितीत भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला. भाजपा अनुसुचित जाती आघाडीच्यावतीने कांदिवली पश्चिमेस समता क्रिडा भवन येथील सभेत त्यांचे स्वागत करताना श्री. राम नाईक म्हणाले, ''देशातील जनता काँग्रेसच्या नाकर्तेपणास कंटाळली असून काँग्रेसने दलितांना वर्षानुवर्षे झुलवत ठेवले आहे. त्यात प्रचंड वाढलेली महागाई, आतंकवाद यापासून जनतेचे संरक्षण करण्यास काँग्रेस अपयशी ठरली आहे. दलित समाजात जागृती होत असून हा समाज मोठ्या प्रमाणात भाजपाकडे आकर्षित होत आहे. येणाऱ्या काळात श्री. लालकृष्ण अडवाणी यांचे नेतृत्वाखालील सरकार दलित बांधवांना न्याय देईल असा विश्वास सर्व दलित बंधूंनी बाळगावा''

यावेळी बोलताना मुंबई भाजपाचे अध्यक्ष आमदार श्री. गोपाळ शेट्टी म्हणाले की, दलित समाज स्वातंत्र्यापूर्वी व स्वातंत्र्यानंतरही आजसुध्दा आपल्या न्याय्य हक्कासाठी संघर्ष करीत असून केवळ संघर्षच त्यांच्या पाचवीला पुजलेला आहे. आपणासाठी भाजपाची दारे उघडी आहेत. संघटीतपणे आपली ताकद दाखवून सत्तेत सामील व्हा असे आवाहन ही श्री. शेट्टी यांनी केले.महाराष्ट्राचे माजी समाज कल्याण मंत्री श्री. विजय (भाई) गिरकर म्हणाले, ''सामाजिक न्याय, बंधुत्व हे बाबासाहेबांचे स्वप्न साकार करण्यासाठी भाजपा कटिबध्द आहे. भारतीय घटनेचे जतन भाजपा करु शकेल. निःसंकोचपणे समाज बांधवांनी भाजपाच्या झेंड्याखाली एकत्रित यावे. काँग्रेस हे जळते घर आहे. तेथे दलितांनी प्रवेश करु नये हे बाबासाहेबांचे म्हणणे ऐकले असते तर आज समाजाची अशी दुर्दशा झाली नसती. धर्मांतरीत ख्रिश्चन व मुस्लीमांना आरक्षण देण्याचा डाव काँग्रेसने रचला आहे तरी आपण संघटितपणे तो हाणून पाडला पाहिजे.''

यावेळी मुंबई भाजपा उपाध्यक्ष श्री. रमेश मेढेकर, मुंबई अनुसूचित मोर्चा अध्यक्ष श्री. शंकर कांबळे, उत्तर मुंबई भाजपा अध्यक्ष श्री. योगेश सागर, उत्तर मुंबई अनुसूचित मोर्चा अध्यक्ष श्री. गौतम पंडागळे यांचीही भाषणे झाली. मंचावर सर्वश्री अतुल भातखळकर, जयप्रकाश ठाकूर, विजय इंगळे, प्रा. डि.डि.कांबळे इत्यादी मान्यवर उपस्थित होते. सदर कार्यक्रमात इतर पक्षातील काही पदाधिकाऱ्यांनी भाजपामध्ये प्रवेश केला त्यात रिपब्लीकन पार्टी उत्तर मुंबईचे संघटन सचिव श्री. दिपक कोरडे, तसेच सर्वश्री. कांताभाई सुरवसे, कृष्णा कांबळे, शशीकांत खरात, प्रविण गायकवाड, संदिप साबळे व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे उत्तर मुंबई जिल्हा उपाध्यक्ष श्री. राजेश साळवे व त्यांच्या अनेक सहकाऱ्यांचा समावेश आहे. शेवटी आभार प्रदर्शन श्री. सुनिल कदम यांनी केले व सुत्रसंचालन श्री. गिरधर साळुंके यांनी केले. सामुदायिक वंदे मातरम् होऊन कार्यक्रम संपला.

प्रकाश [illegible]

(कार्यालय सचिव)